# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील टीईटी परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत

**(१) ७११ (२४-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गांमध्ये" मागील १० वर्षांपासून "ज्ञानदानाचे पवित्र कार्य" करणाऱ्या शिक्षकांच्या नेमणुकीस शिक्षण विभागाकडून वैयक्तिक मान्यता प्राप्त होऊन सदर शिक्षक अनुदान, विनाअनुदान तत्वावर कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांनी सन २०१९ नंतर टीईटी परीक्षा उत्तीर्ण केलेली असूनही शिक्षकांचे वेतन शासनाने रोखले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टीईटी परीक्षा उत्तीर्ण केलेल्या शिक्षकांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री.दादाजी भुसे (२४-०९-२०२५) :** (१), (२) व (३) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार कार्यरत शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ अखेर धारण करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करण्यात याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मार्च २०१९ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या बाबतीत वेगळ्याने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

---

### राज्यातील समग्र शिक्षा अभियानांतर्गत अत्यल्प मानधनावर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शिक्षकांच्या रिक्त जागांवर समायोजन करण्याबाबत

**(२) १२८६ (२४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत, शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आणि गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्यासाठी, प्रत्येक तालुक्यात ६ याप्रमाणे, संपूर्ण राज्यात व्यावसायिक पदवीधारक १९०६ विषय संधन व्यक्ती, गेल्या १८ वर्षांपासून अत्यल्प मानधनावर कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यक्ती संघटनेने या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त जागांवर समायोजन करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक ०४/०६/२०२५ अन्वये समिती गठीत आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षांमध्ये होणारी कॉपी रोखण्यासाठी शिक्षण मंडळाने घेतलेल्या निर्णयाला विरोध होत असल्याबाबत

**(३) १६५४ (२४-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इयत्ता दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परिक्षांमध्ये होणारी कॉपी रोखण्यासाठी केंद्र संचालक, पर्यवेक्षक, आणि इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या निर्णयाला शिक्षक व मुख्याध्यापक संघटनाकडून विरोध करण्यात आल्याचे माहे जाने, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या निर्णयाला शिक्षक व मुख्याध्यापक संघटनाकडून होणारा विरोध लक्षात घेता याबाबत फेरविचार होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०८-२०२५) :** (१) होय,हे खरे आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षा या समतामुलक वातावरणात होण्यासाठी या वर्षी शालांत प्रमाणपत्र परीक्षांच्या आयोजनासाठी राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात आले होते. परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासन स्तरावरुन मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन यांनी स्वत: आभासी प्रणालीच्या माध्यमातून सर्व शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक यांना मार्गदर्शन केले होते.
(२) होय, हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी, विविध शिक्षक व मुख्याध्यापक संघटनांकडून होणाऱ्या विरोधामुळे केंद्र संचालक, पर्यवेक्षक, आणि इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयात बदल करण्यात आला होता.तसेच ज्या परीक्षा केंद्रावर मागील ५ वर्षांमध्ये गैरमार्गाची प्रकरणे आढळून आली आहेत अशाच परीक्षा केंद्रावर केंद्र संचालक,पर्यवेक्षक व परीक्षेशी संबधीत इतर व्यक्तींच्या नियुक्तीमध्ये बदल करण्यात आला होता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरात आरटीई साठी शाळांच्या नोंदणीमध्ये घट झाल्याबाबत

**(४) १७३९ (२४-०४-२०२५) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत आरटीई (शिक्षण हक्क अधिनियम) अंतर्गत शाळांच्या नोंदणीमध्ये कमालीची घट झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोंदणी झालेल्या शाळांमधून आरटीई अंतर्गत एकूण किती जागा उपलब्ध झाल्या आहेत याबाबतचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, आरटीई (शिक्षण हक्क अधिनियम) अंतर्गत शाळांच्या नोंदणीमध्ये घट झाल्याची कारणे काय आहेत, तसेच शासनाने आरटीई (शिक्षण हक्क अधिनियम) अंतर्गत शाळांची नोंदणी वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुंबई शहर व उपनगरात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५ टक्के अंतर्गत ३३८ शाळांमधील ६,४६० जागांवर ऑनलाईन लॉटरीद्वारे पात्र ३,५४१ बालकांना प्रवेश देण्यात आला होता. त्याचप्रमाणे, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ३२७ पात्र शाळांमधील आरटीई २५ टक्केच्या ६,०५३ रिक्त जागांसाठी ऑनलाईन लॉटरीद्वारे पात्र ३,१०३ बालकांना प्रवेश देण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळांनी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्या शाळांना नोंदणी न करण्याची सुट देण्यात आली आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व शाळांची नोंद पोर्टलवर करण्यात आल्याप्रमाणे नियमानुसार पात्र शाळांचा समावेश ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या प्रक्रियेमध्ये झाल्यानंतर शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या स्तरावरून आरटीई २५ टक्के प्रवेशाबाबत जाहिरात/ सुचना देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालय व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात

**(५) १८३३ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे : दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक २३१३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालय तसेच ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचेसमवेत मंत्रालयात बैठक झाली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रंथालयांना ४० टक्के अनुदान वाढ, शासकीय अनुदानातून कर्मचाऱ्यांना वेतन व इतर खर्चाचे प्रमाण ठरवणे तसेच इतर तीन मागण्यांच्या संदर्भात मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येईल असे निर्णय घेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालय तसेच ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या उपरोक्त मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
सार्वजनिक ग्रंथालयाच्या विविध प्रश्नासंदर्भात मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(२) व (३) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये सुधारणा अधिनियम २०२४ दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी संमत झाला आहे.
सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ४० टक्के अनुदान वाढ करण्याचा प्रस्ताव तसेच सन २०१२ पासून मान्यता रद्द करण्यात आलेल्या अकार्यक्षम ग्रंथालयाऐवजी अन्य व्यवस्थापनाच्या ग्रंथालयांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## शासनाच्या जिल्हा परिषदांच्या शाळातील शिक्षण सेवकांचा परिविक्षाधीन कालावधी रद्द करणेबाबत

**(६) १८३९ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण सेवक या पदावर ३ वर्षांच्या परीविक्षाधीन कालावधीसाठी शिक्षकांची नियुक्ती अल्प मानधनावर केली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतरत्र कोणत्याही राज्यामध्ये अशा प्रकारच्या तरतुदी नसल्यामुळे राज्यातील सदर तरतूद रद्द करून नियुक्तीनंतर तात्काळ पूर्ण वेतनश्रेणी लागू करावी अशी मागणी सदर शिक्षकांच्या संघटनांनी तसेच विविध लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक १७/०९/२०११ नुसार प्राथमिक शिक्षकांना रुपये ६०००/-, माध्यमिक शिक्षकांना रुपये ८०००/- व उच्च माध्यमिक शिक्षकांना रुपये ९,०००/- इतके मानधन दिले जात होते. यामध्ये वाढ करुन सन २०२३ पासून शासनाने प्राथमिक

शिक्षकांना १६,०००/-, माध्यमिक शिक्षकांना १८,०००/- व उच्च माध्यमिक शिक्षकांना २०,०००/- एवढी मानधन वाढ करण्यात आली आहे. शिक्षण सेवक योजनेची तरतूद रद्द करणेबाबतची मागणी होत आहे. तसेच शिक्षकाने ३ वर्ष समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतरच त्यांना नियमित करण्यात येऊन नियमित वेतनश्रेणी देण्यात येते. यास्तव हा कालावधी परिविक्षाधीन समजण्यात येतो. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षक हा समाधानकारक सेवा करणारा असणे ही बाब सर्वमान्य आहे. तसेच शिक्षण सेवक कालावधी हा सेवानिवृत्ती वेतन व वरिष्ठ वेतनश्रेणी साठी ग्राह्य धरण्यात येतो. परिविक्षाधीन कालावधी रद्द करणे ही मागणी मान्य करणे उचित होणार नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक विकास विभागाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(७) १८४५ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्यांक विकास विभागाचा सन २०२४-२५ या वर्षातील निधी मोठ्या प्रमाणावर अखर्चित राहिला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांक विभागाचा निधी अखर्चित राहिल्यामुळे अल्पसंख्याक समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झाला नसल्याने अल्पसंख्यांक समाज मोठ्या प्रमाणात विकास कामांपासून वंचित राहीला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अल्पसंख्यांक विकास विभागाचा निधी दरवर्षी अखर्चित राहत असून सदर निधी विहित कालावधीत खर्च होण्यासाठी शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (२२-०८-२०२५) :** (१) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण रुपये ८१२.०० कोटी तरतुदीपैकी माहे डिसेंबर, २०२४ अखेर एकूण रुपये ६५४.६९७ कोटी इतकी रक्कम अखर्चित होती. मात्र ३१/०३/२०२५ अखेर पर्यंत फक्त रुपये २०९.०८ कोटी इतकी रक्कम अखर्चित होती.

(२) हे खरे नाही.

(३) अल्पसंख्याक विकास विभागाच्या बहुतांश योजना जिल्हाधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येतात. जिल्हास्तरावरुन प्राप्त मागणीच्या अनुषंगाने निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(८) १९२९ (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने शिक्षक भरती करण्याची मागणी बहुतांश शाळा व्यवस्थापनांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक ९ फेब्रुवारी, २०२५

रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांच्या रिक्त पदांचा विपरीत परिणाम शैक्षणिक कामकाजावर आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) संपूर्ण राज्यातील नियुक्ती प्राधिकारी यांनी केलेल्या मागणीनुसार पात्र उमेदवारांची शिफारस पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येत असते. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये या संपूर्ण भरती प्रक्रीयेमध्ये मुंबईतील शाळांचा देखील समावेश आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात दहावी, बारावी परीक्षांच्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख न करण्याबाबत

**(९) १९४१ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दहावी, बारावी परीक्षांच्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात येत असल्याने समाजातील सर्वच स्तरातून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्यानंतर परीक्षा मंडळाने प्रवेशपत्रेच रद्द केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यावर इतर उल्लेखासोबतच यंदा प्रथमच जात प्रवर्ग नमूद केला असून शासनाने याबाबत आवश्यक सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

विद्यार्थ्यांचे परीक्षेची आवेदनपत्रे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्द्तीने भरली जातात. त्यात शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून अनावधानाने जात प्रवर्ग नोंदवताना चुका होतात त्यामुळे

मंडळामार्फत प्रथमतःच विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांवर जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला होता.निकालानंतर विविध स्कॉलरशिप तसेच पुढील शिक्षणाच्या प्रवेशाकरीता माहिती देताना त्यात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यांना नाहक त्रास होवून विद्यार्थी विविध लाभांपासून वंचित राहतात. फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेकरीता मंडळामार्फत नविन सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून प्रवेशपत्रात QR Code, तारीखनिहाय वेळापत्रक पेपर तसेच पडताळणीच्या दृष्टीने जात प्रवर्ग इ. बदल करुन त्याची नोंद घेण्यात आली होती.
(२) मंडळामार्फत सदरचे जात प्रवर्ग नमूद केलेली प्रवेशपत्रे रद्द करण्यात येऊन सुधारित प्रवेशपत्रे दिनांक २०/०१/२०२५ पासून मंडळ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली होती.सदरची प्रवेश पत्रे विद्यार्थ्यांना वेळीच मिळाल्याने इयत्त १० वी व इयत्ता १२ वी परीक्षा देखील सुरळीत पार पडली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये देण्यातआलेली वेडिंग यंत्रे वापरविना असल्याबाबत

**(१०) २०४४ (२४-०४-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक २३०१३ ला दिनांक २८ जून, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमध्ये देण्यात आलेली ९,९४० सॅनेटरी पॅड व्हेंडीग यंत्रे वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंत्रासाठी वीज नसणे अशा तांत्रिक कारणाबरोबरच मुलींना संकोच वाटणे ही बाब कारणीभूत असून यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या मशीनचा वापर व्हावा याकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-०८-२०२५) :** (१) व (२) सन २०२२-२३ व सन २०२३-२४ मध्ये राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण १८,१४३ (९,९४०+८,२०३) शाळांमध्ये सॅनिटरी पॅड्स वेन्डिग मशिन्स आणि इन्सिनरेटरचा पुरवठा झाल्यानंतर संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी यशस्वीरित्या कार्यान्वित झाल्याबाबत पोहोच दिलेली आहे. तसेच, उपलब्ध करून देण्यात आलेली मशिन बंद झाल्यास त्या मशिनवर असलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याच्या पुरवठादार व राज्यस्तरावरून सर्व जिल्ह्यांना आढावा बैठकीत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

शालेय किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी इन्सिनरेटर (डिस्पोजल मशिन) आणि मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन (MHM) बाबत पेन ड्राईव्ह/ युएसबी ड्राईव्हमध्ये प्री-लोड केलेला डेमो व्हिडीओ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच, मशिन कार्यान्वित असल्याबाबतची प्रत्यक्ष तपासणी करून सर्व मशिन सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांच्या नियुक्ती व अहर्ता शिथिलतेबाबत

**(११) २२६० (१६-०६-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग समावेशित शिक्षण (माध्यमिक स्तर) या योजनेतंर्गत, कार्यरत विशेष शिक्षकांचे प्रकरणी आवक-जावक, विद्यापीठ यादीतील तसेच शैक्षणिक व व्यावसायिक यादीतील विशेष शिक्षकांना पात्र ठरविण्यासाठी, तत्कालीन मा.शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अहर्ता शिथिलतेबाबत शासनास पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षण अभियान, मुंबई यांनी शैक्षणिक व व्यावसायिक शिथिलतेसंदर्भात भारत सरकारकडे मार्गदर्शनासाठी पत्र पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांच्या नियुक्ती व अहर्ता शिथिलतेबाबत निर्णय घेऊन आयुक्त व शिक्षण संचालक यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तत्कालिन मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी दिनांक १०/१०/२०२३ रोजीच्या बैठकीत विशेष शिक्षकांची नियुक्तीच्या वेळी शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक अर्हता आरसीआय प्रमाणपत्राची अट शिथील करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे विचारणा करण्यात यावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार, शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा) यांच्याकडे केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्याची विनंती केली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत राज्य प्रकल्प संचालक (समग्र शिक्षा) यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांची विनाअनुदानित पदावरून अनुदानित पदावर बदली करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१२) २९२५ (१८-०७-२०२५) श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७५४८ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाअनुदानित पदावरून पदावर अनुदानित पदावरील बदली करण्याबाबत शिक्षणाधिकारी व विभागीय उपसंचालक यांनी सर्व प्रस्ताव तपासून शासन स्तरावर पाठविण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले

असून शेकडो शिक्षक यांचे प्रस्ताव शासन स्तरावर गत २ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ डिसेंबर, २०२२ अन्वये दिनांक ८ जून, २०२० रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीस स्थगिती देण्यात आली असून, सदर परिपत्रकान्वये आयुक्त (शिक्षण) यांना अहवाल सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते त्यानुसार सदर अहवाल शासनास प्राप्त झाला असून अहवालाच्या अनुषंगाने तसेच सदर प्रस्ताव शासन स्तरावर निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत बदल्यांबाबतचे अधिकार शासनाकडे घेण्याबाबतच्या दिनांक २९/०४/२०२४ च्या शासन निर्णयास मा.न्यायालयाने स्थगिती दिली असून, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ४१-अ मधील तरतूदीनुसार तपासून निर्णय घ्यावा, असे सक्षम प्राधिकाऱ्यांस आदेशित केले आहे. त्यानुसार नियमात अंतिमत: बदल होत नाही तोपर्यंत नियम ४१-अ मधील तरतूदीनुसार प्रस्ताव तपासून सक्षम प्राधिकारी निर्णय घेऊ शकतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांचा शिक्षण सेवक कालावधी कमी करणेबाबत

**(१३) ३०५१ (१८-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवित्र प्रणाली भरती टप्पा एक मार्फत नियुक्त बहुतांश शिक्षक उमेदवार हे अगोदर विविध आस्थापनांवर कार्यरत असल्यामुळे त्यांनी अगोदरच परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केला असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, जे नवीन शिक्षक शंभर टक्के अनुदानित प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळेत रुजू होतील तेव्हा त्यांचा शिक्षण सेवक कालावधी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत. सदरची मागणी व यापूर्वी विहीत शिक्षणसेवक योजना यांचा अभ्यास करुन याबाबत यथोचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि जिल्ह्याचे मानांकन उंचावण्यासाठी उपाययोजना करण्याबबात

**(१४) ३२५५ (१८-०७-२०२५) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (SCERT) राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांसाठी लागू केलेल्या गुणवत्ता व मूल्यांकन आश्वासन आराखडा (Quality and Assessment Assurance Framework) अंमलबजावणीत सांगली जिल्हा ३६ व्या क्रमांकावर आला असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात किंवा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हा हा राज्याला 'मॉडेल स्कूल' देणारा जिल्हा असतानाही, गुणवत्ता व मूल्यांकन आराखड्यात सांगली जिल्ह्याला शेवटचा क्रमांक मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि जिल्ह्याचे मानांकन उंचावण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (१८-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ०४ मार्च २०२५ ते १० मार्च २०२५ या कालावधीत SQAAF रजिस्ट्रेशनमध्ये मध्ये सांगली जिल्हा ३६ व्या क्रमांकावर होता. तथापि, माहे मे च्या पहिल्या आठवड्यात (दिनांक ०५ मे चा अहवाल) १८ व्या क्रमांकावर होता.दिनांक १५ मे, २०२५ च्या अहवालानुसार सांगली जिल्हा SQAAF रजिस्ट्रेशनमध्ये ११ व्या क्रमांकावर होता.
(२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सांगली यांनी पत्रात नमूद केलेनुसार - सांगली जिल्ह्यामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत गुणवत्ता शोध चाचणी घेण्यात येते. दिनाक ०६/०३/२०२५ रोजी गुणवत्ता शोध चाचणी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन चालू होते तसेच सराव पेपर चालू होते. त्यामूळे दिनांक ०४ मार्च ते १० मार्च या कालावधीत शाळांनी SQAAF ची माहिती भरलेली होती परंतु फायनल सबमिट केलेली नव्हती त्यामूळे या कालावधीत SQAAF रजिस्टेशन मध्ये सांगली जिल्हा ३६ व्या क्रमांकावर होता.त्यानंतर गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांना ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्स घेऊन मार्गदर्शन केले व त्यानंतर १५ मे च्या अहवालानुसार सांगली जिल्हा ११ व्या क्रमांकावर आला होता.
(३) परीक्षांचा कालावधी, जिल्हा स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षा तयारी यामुळे स्वयं-मूल्यांकनासाठी दिनांक ३० जुन, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या अंतिम अहवालानुसार सांगली जिल्ह्यातील एकूण २९८० शाळांच्यापैकी २८८५ शाळांनी स्वयं-मूल्यांकन पूर्ण केले असून, ७५ शाळांनी आपली माहिती अपूर्ण भरली आहे तर २० शाळांनी SQAAF पोर्टलवर आपली नोंदणी केली नाही.
शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि जिल्ह्यांचे मानांकन उंचावण्यासाठी, सांगली जिल्ह्यातील स्वयं-मूल्यांकन केलेल्या शाळांच्यापैकी ३०७ (सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या ५% शाळांचे तसेच जिल्ह्यातील सर्व पी.एम.श्री., सी.एम.श्री., व सर्व आदर्श शाळांचे) बाह्य-मूल्यांकन माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये करण्यासंबंधी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण नागपूर येथील रिक्त झालेल्या पीठासीन अधिकारी पदी तात्काळ नियुक्ती करण्याबाबत

**(१५) ३७९१ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या कार्यक्षेत्रासाठी नागपूर येथे विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण हे स्थापित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या न्यायाधिकरणाचे पीठासीन अधिकारी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने येथील पद रिक्त झाले असून हे रिक्त पद अद्याप भरण्यात आले नसल्याने पद त्वरीत भरण्यासाठी नागपूर शिक्षक विभागाचे तत्कालीन लोकप्रतिनीधी यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने दिनांक २७ फेब्रुवारी,२०२५ व ७ एप्रिल,२०२५ रोजी विभागास पत्र पाठवून सदर रिक्त पद त्वरीत भरण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन लोकप्रतीनिधी यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने सदर रिक्त पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२२-०९-२०२५) :** (१) होय

(२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायधिकरण पीठासीन अधिकारी येथील रिक्त असलेले पीठासीन अधिकारी पद भरण्याबाबत दोन मा.विधानपरिषद सदस्य यांची अनुक्रमे दिनांक १०/१/२०२५ तसेच दिनांक १९/३/२०२५ रोजीची पत्रे प्राप्त झाली आहेत.

(३) दिनांक ०७/०४/२०२५ रोजीच्या आदेशान्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायधिकरण येथील पीठासीन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांच्यामार्फत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायधिकरण येथील पिठासिन अधिकारी पदाकरीता तीन नावांची नामिका (panel) प्राप्त करून घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नार्बाड च्या नविन नियमावलीनुसार शेतकऱ्यांना कमी कर्ज मिळणार असल्याबाबत

**(१६) ४१७१ (१८-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाबार्डच्या नविन नियमावलीनुसार वारसा हक्क शेतजमीनीनुसार शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना कमी कर्ज मिळणार असल्याचे माहे मे,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाबार्डने कर्ज वाटपाची पध्दत बदलल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे तसेच सेवा संस्थाचे व्यवहारही कमी होणार असल्याने शेतकऱ्यांना हक्काचे दीड-दोन लाख रुपये पीक कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांच्या नविन पीक कर्जाबाबत आढावा घेऊन शेतकऱ्यांना सुलभ पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (२४-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही,

वारस हक्कांबाबत नाबार्डमार्फत सुचना अथवा नियमावली निर्गमित करण्यात आलेली नाही.
(३) सन २०२५-२६ साठी पीकनिहाय कर्जदर दिनांक १०/०३/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे सर्व जिल्हा बँकांना कळविण्यात आले आहेत.

सन २०२५-२६ मधील पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १९/०५/२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय बॅकर्स समितीच्या सभेमध्ये बँकांना सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये जिल्हाधिकारी यांना मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मार्गदर्शनपर सूचना दिल्या आहेत.

तसेच याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त यांचे स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. तसेच दिनांक २७/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शेतकऱ्यांना निर्धारित लक्षांकाप्रमाणे बँकामार्फत पुरेशा प्रमाणात व विहित वेळेत पीक कर्जपुरवठा होण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती गठीत करण्यात आली आहे.

राज्यामध्ये सन २०२५ च्या खरीप हंगामासाठी लक्षांक रुपये ५४,०८६ कोटी निश्चित करण्यात आला आहे. त्यापैकी दिनांक १५/०८/२०२५ पर्यंत ३२.२४ लाख शेतकऱ्यांना रुपये ३५,१५० कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप बँकांनी केले असून लक्षांक पूर्तता ६५ टक्के आहे. खरीप पीक कर्ज वाटपाची कार्यवाही सध्या सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील चार ते साडेचार लाख शिक्षक विनावेतन असल्याबाबत

**(१७) ४१७४ (१८-०७-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्राथमिक, खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाकडे पैसे नसल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे चार ते साडेचार लाख शिक्षक विनावेतन राहणार असून सदर शिक्षकांना त्यांच्या सेवेचे वेतन वेळेत मिळण्याकरीता आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०७-१०-२०२५) :** (१) राज्यात प्राथमिक, खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या माहे मार्च, २०२५ वेतनाकरीता दिनांक ०९/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आवश्यक निधी वितरित केलेला आहे. सदर शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाकरीता दरमहा वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेल्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या अनियंत्रित कारभाराबाबत

**(१८) ४२५० (१८-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेहरूनगर मस्तवडे (ता.तासगाव, जि.सांगली) त्याचप्रमाणे वडगाव येथील शाळांमध्ये एकही शिक्षक नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांमध्ये गेत दोन महिन्यात अशैक्षणिक पध्दतीने काम सुरू असून व ग्रामीण भागातील सामान्य घरातील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळेशिवाय पर्याय नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावकऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा केल्यानंतरही गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र शाळा प्रमुख या तीन पातळयावर नियंत्रण ठेवत नसल्याने त्यांची निष्क्रियता दिसून येते, तसेच तेथील मुख्याध्यापक देखील शाळा समितींना जुमानत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नेहरूनगर मस्तवडे,वडगाव येथील शाळांमध्ये शिक्षक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (२४-०९-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) जिल्हा परिषद शाळा नेहरुनगर, बस्तवडे व वडगाव तालुका तासगाव येथील तिन्ही शाळांमध्ये शिक्षक कार्यरत आहेत. तसेच गट शिक्षणाधिकारी केंद्रप्रमुख विस्तार अधिकारी यांचे शालेय कामकाज नियोजन प्रमाणे सुरु असून याबाबत कोणतीही अनियमितता दिसून आलेली नाही. तसेच ज्या जिल्हा परिषद शाळेवर शिक्षकांची गरज आहे. तेथे आंतर जिल्हा बदली २०२३-२४, पवित्र प्रणाली भरती व मनपा समायोजनाद्वारे शिक्षक प्राप्त होताच, शाळांवर नियमित शिक्षक उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येते. तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी, २०२५ झाली असून, त्या आधारे पवित्र प्रणाली मार्फत शिक्षक भरतीबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी शासकीय शाळांत इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी (आयसीटी) प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) ४३२३ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या ६५ हजार शाळा असून त्यांपैकी १,३३१ शाळांमध्ये इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी लॅब, तसेच १,५७८ शाळांत स्मार्ट क्लासरूम्स उपलब्ध नसल्याचे शालेय शिक्षण विभागाच्या वार्षिक कार्य नियोजन अंदाजपत्रक अहवालातून दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि तदनुषंगाने विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी शासकीय शाळांमध्ये प्रयोगशाळा इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी लॅब, व स्मार्ट क्लासरूम्स उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०८-२०२५) :** (१) व (२) सन २०२४-२५ च्या यु-डायस माहितीनुसार महाराष्ट्र राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण १,०८,१५७ शाळा आहेत. यामध्ये शासकीय ६४,७९० शाळांपैकी जिल्हा परिषदांतर्गत ६०,०७० इतक्या शाळा आहेत.

सन २०२३-२४ च्या यु-डायस माहितीनुसार राज्यातील शासकीय माध्यमिक १८८७ शाळांपैकी १३५२ शाळांमध्ये व उच्च माध्यमिकच्या ३६९ पैकी २७७ शाळांमध्ये प्रयोगशाळांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच, सन २०२४-२५ च्या यु-डायस माहितीनुसार केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेतून १०,४६३ शाळांमध्ये आयसीटी प्रयोगशाळांची आणि ३,२९२ शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूमची निर्मिती करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये केंद्र शासनाच्या निकषानुसार समग्र शिक्षा योजनेतून उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये ८२ आयसीटी लॅब व पीएम-श्री योजनेतून ३०३ अशा एकूण ३८५ आयसीटी लॅब व १६१४ शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूमची निर्मिती करण्यासाठी मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच, ज्या शाळांना प्रयोगशाळा उपलब्ध करून देता आलेल्या नाहीत, अशा शाळांबाबत समग्र शिक्षा, पीएम-श्री व स्टार्स या केंद्र पुरस्कृत योजनांच्या पुढील आर्थिक वर्षातील वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात प्रयोगशाळा मंजूरीचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खासगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत

**(२०) ४३७३ (१८-०७-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सन २००५ नंतर शिक्षकेतर पदांची भरती झालेली नाही तसेच या शाळांतील कर्मचारी संघटना यांची आंदोलने,पत्रव्यवहार,

मा.न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय त्यानुसार शासनाने सुधारित आकृतिबंध जाहीर करुन पदभरती करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सन २०२४-२५ च्या संचमान्यतेचे कारण देत संबंधित पदभरती स्थगित केल्यामुळे उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर स्थगितीचा निर्णय उठवून सदरील पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मा.न्यायालयाने शिक्षकेतर कर्मचारी यांचे आकृतीबंधास स्थगिती दिल्याने पदे भरण्यात येत नव्हती. सदरची स्थगिती उठली असून, सदरची पदे भरण्याचा मार्ग उपलब्ध झालेला आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे काही अटींच्या अधिन राहून १०० टक्के पदे सरळसेवेने भरण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडून दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये सन २०२४-२५ ची संचमान्यता पूर्ण झाल्यावर रिक्त पदांचा आढावा घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाल्यानंतर शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीबाबत निर्णय घेतला जाईल तोपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षकेतर भरती करण्यात येऊ नये, असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार याबाबत यथोचित निर्णय होऊन सदरची पदे लवकरात लवकर भरण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.